
ISSN : 2277-8063


विशेषांक
३१ मार्च २०१९

# गांधी



# आणि मानवी हक्क

*Father of our Nation*



Navjyot
नवज्योत

International Interdisciplinary Research Journal
(Humanities, Social Sciences, Languages, Commerce & Management)

Scanned with CamScanner

# मुख्य संपादक



संदीप तुंडूरवार,एम.ए., पीएच.डी., सेट

संदिप तुंडूरवार
पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
श्री. बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर

- ❊ दहा राष्ट्रीय परिषदांचे यशस्वी आयोजन
- ❊ अध्यापन क्षेत्रात २२ वर्षाचा अनुभव
- ❊ दोन विद्यार्थ्यांना आचार्य पदवी प्राप्त
- ❊ दोन पुस्तके प्रकाशित, सहा ग्रंथाचे प्रकाशन
- ❊ अभ्यास मंडळ सदस्य, रा.तु.म. ना. विद्यापिठ



डॉ. शरद सांबारे, एम.ए., एम.फिल., पीएच.डी.

डॉ. शरद सांबारे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
यशोदा गर्ल्स ऑर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
स्नेहनगर, नागपूर

- ❊ आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय पातळीवर ४५ शोध निबंध सादर
- ❊ पाच संदर्भग्रंथाचे संपादन
- ❊ अभ्यास मंडळ, सदस्य रा.तु.म.ना.वि.ना.
- ❊ कॉलेज व्यवस्थापन समिती सदस्य
- ❊ नऊ राष्ट्रीय परिषदांचे यशस्वी आयोजन
- ❊ २५ वर्षाचा अध्यापन क्षेत्रातील अनुभव
- ❊ ६ विद्यार्थ्यांचे संशोधक मार्गदर्शक

# सह संपादक



डॉ. नागेश्वर कन्नाके,एम.ए., बी.एड., पीएच.डी.

डॉ. नागेश्वर कन्नाके
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, वाशिम

- ❊ आंतरराष्ट्रीय -राष्ट्रीय पातळीवर ३० शोधनिबंध सादर
- ❊ पाच संदर्भ ग्रंथाचे संपादन
- ❊ नऊ राष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन
- ❊ २२ वर्षाचा अध्यापन क्षेत्रातील अनुभव



डॉ. वकील शेख, एम.ए., बी. एड., पीएच.डी.

डॉ. वकील शेख
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, तायवाडे महाविद्यालय कोराडी

- ❊ आंतरराष्ट्रीय-राष्ट्रीय पातळीवर ४० शोधनिबंध सादर
- ❊ सहा संदर्भग्रंथाचे संपादन
- ❊ अभ्यास मंडळ सदस्य, रा.तु.म.ना.वि. नागपूर
- ❊ आठ राष्ट्रीय व एका राज्यस्तरीय परिषदेचे यशस्वी आयोजन
- ❊ २५ वर्षाचा अध्यापन क्षेत्रातील अनुभव
- ❊ ८ विद्यार्थ्यांचे संशोधक मार्गदर्शक
- ❊ ४ विद्यार्थ्यांचा प्रबंध सादर



डॉ. कल्पना टेकाडे, एम.ए., एम.फिल., पीएच.डी.

डॉ. कल्पना टेकाडे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. एम.के. उमाठे महाविद्यालय, नागपूर

- ❊ तीन राष्ट्रीय परिषदांचे यशस्वी आयोजन
- ❊ अध्यापनाचा २५ वर्षाचा अनुभव
- ❊ सदस्य, राज्यशास्त्र प्राध्यापक परिषद (विदर्भ प्रांत), नागपूर
- ❊ आंतरराष्ट्रीय-राष्ट्रीय व राज्य पातळीवर ४२ शोधनिबंध प्रकाशित
- ❊ एम.पी.एस.सी. च्या पेपरचे मुल्यांकन
- ❊ महाराष्ट्र शासनाच्या पंचायती महिला सशक्तीकरण अभियानात आमंत्रक

Scanned with CamScanner

# गांधी आणि मानवी हक्क

संपादक

**संदीप तुंडूरवार**

पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख

श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


1) Relevance of Mahatma Gandhi in building Sustainable Society — 1
Aprup Adawadkar

2) Environmental Issues and Mahatma Gandhi — 3
Dr. Babita Singh

3) The Impact of Gandhian Vision and Thoughts on Social Media — 6
Ms. Namrata Mishra

4) Persona of Gandhi from Camera Lenses: A Study of select Hindi movies Based on Gandhi — 10
Khyatimaya Tripathy

5) Mahatma Gandhi : A Pioneer of Value Generation in Contemporary World — 13
Prof. Rajendra Korde

६) आधुनिक विकास और गांधी मार्ग — २१
डॉ. संजय जैन

७) महात्मा गांधी और मानवाधिकार — २५
डॉ. राष्ट्रपाल गणवीर

८) मूठभर मिठाची ताकत — २७
डॉ. विवेक कोरडे

९) गांधी विचारांची दिशा — ३०
श्री. संजय नहार

१०) भारतीय राज्यव्यवस्थेत महात्मा गांधीच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेचे योगदान — ३१
डॉ. अलका देशमुख

११) गांधीच्या चातुर्वर्ण्याचं काय करायचं? — ३५
श्री. चंद्रकांत वानखेडे

१२) राज्याची पुनर्रचना आणि गांधीजी — ३८
प्रा. प्रभाकर कोंडबत्तुनवार

१३) शाश्वत विकास व महात्मा गांधी — ४१
डॉ. रविंद्र भणगे

१४) गांधी तत्त्वज्ञानाचे महात्म्य — ४५
सौ. किर्ती काळसर्पे

१५) जागतिक अशांतता आणि गांधीच्या अहिंसेची प्रकाशकिरणे — ४८
डॉ. रिता धांडेकर

१६) शेती प्रश्नावरील आंदोलने आणि महात्मा गांधी — ५०
विनोद गायकवाड

१७) महात्मा गांधींचा सर्वोदय आणि मानवी हक्क — ५२
डॉ. रतन राठोड

१८) महिला सबलीकरण सदृढीकरण, सक्षमीकरणच्या दृष्टीने गांधी विचारांचे औचित्य — ५६
डॉ. राम बुटले


Scanned with CamScanner

१९) महात्मा गांधी यांच्या विचारातील आध्यात्मिक लोकशाही
डॉ. संदीप काळे
२०) गांधीचा मानवतावाद: जात व अस्पृश्यतेची समस्या आणि उपाय
डॉ. राहूल बावगे
२१) म. गांधींचे राष्ट्रीय एकात्मतेसंबंधीच्या विचाराची प्रासंगिकता
डॉ. प्रशांत विघे
२२) पर्यावरणाचा प्रश्न आणि गांधीचे विचार
डॉ. आशिष काळे
२३) यांत्रिकीकरणावर महात्मा गांधीचे विचार
डॉ. सुधाकर जावळे
२४) महात्मा गांधीच्या दृष्टीकोनातून महिला सबलीकरण
डॉ. नरेश जाधव
२५) महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना
डॉ. संजय अवधूत
२६) महात्मा गांधी आणि ग्रामीणांचे मानवाधिकार
डॉ. हरीदास लाडके
२७) महात्मा गांधींचा पर्यावरणात्मक दृष्टिकोन
डॉ. पौर्णिमा मेश्राम (गणविर)
२८) ग्रामविकासातून स्वावलंबन आणि गांधी चिंतन
डॉ. नंदाजी सातपुते
२९) महात्मा गांधीजींचे ग्रामीण पुनर्रचनात्मक कार्यातील योगदान
डॉ. नितीन गौरखेडे
३०) ग्राम स्वावलंबन आणि गांधी चिंतन
प्रा. पुनम देशमुख
३१) स्वातंत्र्य, समता व मानवता आणि गांधी विचार
डॉ. संजय गोरे
३२) महात्मा गांधी यांचे खादी विषयक विचार आणि भंडारा जिल्हयात खादी प्रचाराचे कार्य
प्रा. पितांबर उरकुडे
३३) समकालीन वैश्विक वातावरणात गांधीजींचे औचित्य
डॉ. बी. जी. जोगदंड
३४) आरोग्य, स्वच्छता संदर्भात गांधी दृष्टिकोन
डॉ. ज्ञानेश्वर यावले
३५) ग्रामस्वावलंबन आणि गांधी चिंतन
प्रा. के. एस. फुलझेले
३६) स्त्री सबलीकरण, सक्षमीकरण आणि गांधीजी
डॉ. संपदा कुल्लरवार

Scanned with CamScanner

३७) आजचे भौतिक आव्हान आणि गांधी विचार पर्याय १०५

प्रा. कल्पना निंबार्ते

३८) गांधी विचारातून आकारास आलेल्या नवसंकल्पना १०७

डॉ. मंगेश रणदिवे

३९) महिलांचे सक्षमीकरणाच्या दृष्टिने गांधी विचारांचे औचित्य ११०

प्रा. पवन महंत

४०) महात्मा गांधीजींचे मानवी विकासातील योगदान : एक दृष्टीक्षेप ११३

डॉ. राजेंद्र बेलोकार

४१) महात्मा गांधीच्या विचारांची प्रासंगिकता ११६

डॉ. धर्मेंद्र तेलगोटे

४२) महात्मा गांधीच्या विचाराची प्रासंगिकता ११८

डॉ. अमर बोंदरे

४३) स्वातंत्र्याच्या पहाटवेळी पडलेले एक स्वप्नः गांधीवाद तर नसेल ना? १२०

डॉ. व्ही. एस. इंगळे

४४) गांधीचा राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रवाद १२४

प्रा. सरला मेश्राम

४५) गांधी विचारातून आकारास आलेल्या नवसंकल्पना १२६

प्रा. प्रविण गुल्हाने

४६) ग्रामस्वावलंबन आणि मं.गांधीजीचे चिंतन १२८

प्रा. जयवंत जुकरे

४७) स्वातंत्र्य आंदोलनातील सत्याग्रह कार्यक्रम १३१

प्रा. बाळकृष्ण रामटेके

४८) ग्रामस्वावलंब आणि गांधी चिंतन १३४

प्रा. लालचंद मेश्राम

४९) महात्मा गांधीची सत्य व अहिंसा संकल्पना : एक ऐतिहासिक अध्ययन १३६

डॉ. सतीश चाफले

५०) भारतात महात्मा गांधींच्या नेतृत्वाचा उदय १३८

कु. हर्षा बेहरे

५१) स्वातंत्र्य आंदोलनातील सत्याग्रह कार्यक्रम १४०

कु. तनुजा पोटे

५२) स्त्री सक्षमीकरण आणि म. गांधी १४२

डॉ. शरद सांबारे

५३) म. गांधी आणि मानवी हक्क १४४

संदीप तुंडूरवार


❖❖❖

Scanned with CamScanner

ISSN: 2277-8063

# म. गांधी आणि मानवी हक्क

संदीप तुंडूरवार, पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागप्रमुख, श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर

**विषय प्रारंभः**

म. गांधीचे समग्र कार्य कर्तव्यावरच आधारीत राहिलेत. गांधी कर्तव्याची भाषा बोलायचे पण त्यात हक्काची प्राप्तता सामावलेली होती. त्यांचे अजून एक वैशिष्टय म्हणजे ते रूढ अर्थाने शब्दांचा वापर करीत नसत त्यामुळे ऐकणाऱ्यांना तसेच समजणाऱ्यांना त्याची प्रत्यक्ष कृती होत नव्हती तोपर्यंत उमजणे शक्य नव्हते. गांधीच्या विचारात हिंदु धर्म, ईश्वर, राम उघडपणे येतो. पण् वैयक्तिक जीवनात मात्र स्तोम नाही, चार्तुवर्ण्याची भाषा उपयोगिली गेली पण हिंदु धर्माच्या उतरंडीतील, जन्माधारित, न बदलणारा वर्ण त्यांना अमान्य होता. कर्माधिष्ठित चार्तुवर्ण्याचा विचार मांडतांना मी सनातनी हिंदु अशी सार्वजनिक भूमिका उघडपणे घेतात पण त्यांच्या सनातीत्वात कर्मकांड, जघन्य रूढी-परंपरा, अंधश्रध्दा यांना थारा नाही. सनातीपणाचा आलेला अर्थ अलिकडे संकुंचित विचारातून आलेला आहे. वस्तुतः सनातनी म्हणजेच प्राच्य विचारात धर्म, कर्मकांड यांना जागा नाही. उलट एकोपा, स्नेह, समन्वय यांचा अंतर्भाव आहे. या आधारावरचे त्यांचे सनातित्व नव्या रचनेत पुरोगामीत्व दर्शविणारे तर आहेच सोबतच मानवी सभ्यतेला प्रतिष्ठीत करणाऱ्या हक्कांचा त्यात अंर्तभाव आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे गांधीच्या कर्तव्यामागे दडलेल्या हक्काचा विचार करणे याप्रसंगी प्रस्तुत आहे.

म. गांधी स्वातंत्र्य लढयाचे अध्वर्यु, कष्टकरी, श्रमीक, शेतकऱ्यांचे प्रणेते, वंचित-शोषित, अस्पृश्य, पिडीत यांच्या वेदनांचे निराकरण करण्याची क्षमता राखणारे व्यक्तीत्व, अहिंसेच्या साधनाच्याद्वारे स्वराज्य प्राप्तीचा ध्यास घेणारे व ते यशस्वी करून दाखविणारे व्यक्तीत्व अशी मांडणी वा ओळख गांधीची राहिलेली आहे. नवी पिढी तर हे समजून घेण्याच्या पावित्र्यात नाही. तसेही एका पिढीचे कार्य तिसऱ्या वा चवथ्या पिढीला प्रकाशमय वाटेल याबाबत शक्यता नसते. पण भारताच्या संदर्भात सर्वच पिढयांनी एक मात्र समजून घेणे अत्यावश्यक आहे ते म्हणजे भारताच्या स्वातंत्र्याची प्राप्ती झाली नसती तर अनेक प्रश्नानी वेढलेला समाज व राष्ट्र यामध्येच खितपत पडून राहावे लागले असते त्यामुळे गांधीकडे बघण्याचा दृष्टिकोन जो स्वातंत्र्य काळात होता त्याची निर्मिती होणे तो रूजणे गरजेचा आहे. दुसरे म्हणजे गांधीचा विचार वा कार्य केवळ स्वातंत्र्य मिळविणे या मर्यादित हेतूपर्यंत मर्यादित राहिलेला नव्हता. त्यांनी राबविलेली कार्य स्वातंत्र्याला नंतरच्या काळात कशी प्रज्वलीत ठेवतील या दृष्टिने मांडली, राबविलीत. एकादशव्रते व रचनात्मक कार्यक्रम या अर्थाने अत्यंत महत्वपूर्ण आहे. मानवातील वा व्यक्तिमध्ये जी लोभ, मोह या भावना निर्माण झाल्यात त्या केवळ स्वःस्वार्थ या अंगानेच विचार केला जातो, त्याकरिता एकादशव्रते नितीमूल्यांची पेरणी करणारी असल्याने व्यक्तीच्या जीवनाला नैतिक आकार देण्याचे त्यात सामर्थ्य दिसून येते. गांधीचे जगभरातील व्यक्तीपेक्षा दिसणारे वेगळेपण म्हणजे इतरांनी स्वातंत्र्याची भाषा आपल्यावरील गुलामी दूर करण्याच्या संदर्भात पाहिली. गांधी मात्र त्याच्या पल्याड जात शाश्वत स्वातंत्र्याची भाषा मांडतात आणि स्वराज्य निर्मितीला कोणकोणते घटक अत्यांवश्यक आहे म्हणजेच बंधनकारक आहे हे मांडून मानवी हक्काचा जाहिरनामा देतांना दिसतात.

**मानवी हक्काप्रती गांधीचा दृष्टिकोनः**

विसाव्या शतकाच्या सुरूवातीला व्यक्तीच्या हक्काची भाषा सुरू झाली. तो पर्यंत हक्क, अधिकार याबाबत बोलल्या जात असले तरी त्याची व्याप्ती मर्यादित होती. फ्रान्समध्ये १७८९ मध्ये राज्यक्रांती झाली. लुईची राजसत्ता संपुष्टात येऊन लोकराज्य तयार झाले. या क्रांतीचा प्रभाव अमेरिकन संविधानावर पडला. आधुनिक काळातील पहिली लिखित राज्यघटना असाच अमेरिकेचा लौकीक आहे. त्यांनी १७९१ मध्ये जनतेला पहिल्यांदा लिखित स्वरूपातील अधिकार प्रदान केलेत. १८ व्या शतकात अधिकारांना विचारात घेण्यास सुरूवात झालेली असली तरी प्रत्यक्षात जागतिक संघटनेने १० डिसेंबर १९४८ रोजी 'मानवी हक्काचा' स्वतंत्र जाहिरनामा घोषीत केला. ३२ अनुच्छेदाच्या माध्यमातून व्यक्तीची प्रतिष्ठा जोपासल्या जावी अशी नैतिक अपेक्षा केली. त्याचवेळी अधिकार व कर्तव्यांची परिभाषा मांडण्यास तसेच त्यातील दोष वा सामर्थ्य दाखविण्यास सुरूवात झाली. अधिकार स्वैराचार निर्माण करतात असा कर्तव्यकर्त्यांचा आक्षेप होता. तर कर्तव्य व्यक्तीला दास्यता प्रदान करत, अशी टिका अधिकारांचे समर्थन करणाऱ्यांची होती. म. गांधी मात्र या संदर्भात वादाची भूमिका न घेता प्रत्येकाने आपले कार्य 'अनासक्ती' ठेऊन पूर्ण केलेत तर प्रत्येकालाच चिरंतन आणि शाश्वत हक्क निरंतर प्राप्त होतील असा नवा विचार आध्यात्मिकतेजवळ जाणारा मांडतात व हक्क आणि कर्तव्यांची परिभाषा नव्या संदर्भात समोर ठेवतात . १९१७ मध्ये चंपारण सत्याग्रहाच्या प्रसंगी मोतीहारी येथे कायदाभंग केला म्हणून गांधीवर खटला भरण्यात आला. त्यावेळी राजेंद्रप्रसाद, शुक्ल, आणि अन्य मान्यवर वकीलांनी गांधीना सोडविण्याकरिता काय करता येईल, कुठले कलम वापरावे याबाबत रात्रभर खल केला. दुसऱ्या दिवशी मोतीहारीच्या कलेक्टर कार्यालयात प्रचंड गर्दी झाली. गांधीना अटक होणार हे एव्हाना संपूर्ण परिसरात माहितही



Scanned with CamScanner

झाले होते. कलेक्टर समोर गांधीच्या विरोधातील खटला सुरू झाला. गांधी शांतपणे म्हणालेत 'की मी कायदा भंग केलेला आहे त्यामुळे मला अटक करावी, पण मी कायदा भंग कर्तव्य म्हणून केलेले आहे. निळ शेतकऱ्यांच्या प्रती अमानवीय, शोषणदायी व्यवहाराला विरोध म्हणून मी माझे कर्तव्य पालन केलेत. आपल्याला जेवढी मोठी शिक्षा ठोठावणे शक्य वाटते तितकी द्या' गांधीच्या या कृतीने सर्वचजण अचंबीत झालेत. यापूर्वी कुणातरीसाठी ज्याच्याशी कुठलेही देणेघेणे नव्हते अशी व्यक्ती कठोर शिक्षा मिळावी अशी मागणी करते, असे घडले नव्हते. गांधीनी कर्तव्य केले आणि पिडीतांना त्यांचा हक्क मिळाला. म. गांधीच्या हक्कासंबंधीचा हा दृष्टिकोन भारतीयाकरिता नवा होता तसाच तो येथील ब्रिटिश राज्यकर्त्या करीता विचारांच्या पलीकडचा होता, त्यामुळे हक्काची त्याच्या प्राप्तेची नवी परिभाषा नवे स्वरूप जन्माला आलेले दिसते. गांधीचा दृष्टिकोन रूढ अर्थापेक्षा त्यामुळे भिन्न आहे.

**म. गांधीचे मानवतावादी कार्यः**

म. गांधीनी आयुष्याची पंच्चावन वर्षे सार्वजनिक सेवेत घालविली. द. अफ्रिका ते भारत हा विस्तीर्ण असा पट आहे. द. अफ्रिकेत बाहेरून गेलेले हिंदी मजूर म्हणून त्यांच्यात एकी निर्माण करणे त्यांना संघर्षासाठी तयार करणे सोपे होते. हा संघर्ष अहिंसक मार्गाने सोडविण्यास तयार करणे तसेच मात्र अशक्यप्राय होते, परंतु गांधीनी ते शक्य करून दाखविले. जनरल स्मटस ला माघार घ्यावी लागली आणि हिंदी जनतेच्या हक्काना संरक्षित करणे भाग पडले. हा निर्णायक विजय होता. ३ पौंड कर देणे, कुटुंब कायम राखण्याचा अधिकार याबाबतच्या संघर्षाला यश मिळाले अन् हक्काची तरतूद झाली. येथेच फिनिक्स आश्रमाच्या माध्यमातून सामूहिक जीवन जगण्याची नवी दिशा गवसली. भारतात परतल्यानंतर ते प्रथम रविंद्रनाथ टागोरांच्या विश्वशांती गुरूकुलात थांबलेत, त्यानंतर अहमदाबाद येथे कोचरब आश्रम सुरू केला. चंपारण्य सत्याग्रहाच्या प्रसंगी त्यांनी एका बाजूला आपले अहिंसक आंदोलन सुरू ठेवले, तर दुसऱ्या बाजूला त्यांनी चंपारण्य, बेतिया, मोतीहारी भागात आश्रम स्थापन करून लोकांमध्ये विश्वास निर्माण करण्याचे कार्य सुरू ठेवले. गांधीना येथील वातावरण व प्रश्न यांची जाण एक वर्षे संपूर्ण भारत फिरल्यानंतर आलेली होती, त्यातूनच त्यांनी रचनात्मक कार्यक्रम सत्याग्रहीना दिलात. त्यांच्या मानवतावादी कार्यात काही महत्वाच्या कार्याचा हक्क या दृष्टिने विचार करता येतो. ज्यामध्ये अस्पृश्यता निवारण, स्त्री-पुरूष समानता, शेतकरी आंदोलन, श्रमप्रतिष्ठा यांचा समावेश आहे.

अस्पृश्तेचा प्रश्न त्यांच्या दृष्टिने अग्रक्रमाचा होत. तो याकरिता, स्वातंत्र्य आंदोलनापासून अस्पृश्य मानल्या गेलेला वर्ग दूर राहिला तर स्वराज्य प्राप्ती होणार नाही. भारतात त्यावेळी एक पंचमांश जनसमूह अस्पृश्य होता. गांधी या संदर्भात म्हणतात. पिढयान्‌पिढया जोपासलेल्या अस्पृश्यतेमुळे आपण गुलाम झालेलो आहोत. आपल्यातील बंधुत्व व एकता नष्ट झाल्यानेच परकीयांना येथे सत्ता राखणे शक्य झालेत. कच्छ प्रांतात एका कार्यक्रमाप्रसंगी गांधीचा सन्मान करण्यात आला. त्यावेळी अस्पृश्य बांधवांना एका कोपऱ्यात बसविल्याचे त्यांच्या लक्षात आले. गांधीनी याबाबत नापसंती दाखविली आणि अस्पृश्य ज्या ठिकाणी बसले होते तेथील कोपऱ्यात जाऊन त्यांनी आपले भाषण केले. १९३३ ते १९३४ या काळात बराच मोठा प्रवास करून त्यांनी या प्रश्नाच्या निराकरणार्थ प्रयत्न केले, उपवास करून आत्मक्लेष करून घेतला. स्नेहभोजन, सामूहिक भोजन, आंतरजातिय विवाह या माध्यमातून वगळलेल्या लोकांमध्ये मानवी अभिव्यक्तीची निर्मिती केली व प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.[7]

स्त्री-पुरूष समतेच्या संदर्भात त्यांनी त्रिसुत्री दिली. स्त्रियांचा दर्जा पुरूषांच्या बरोबरीनेच असेल. स्त्री जी कुटुंबात काम करते ती कामे पुरूषांनी करावित. स्त्रीचा तिच्या शरीरावरील हक्क मान्य करावा. गांधीना परंपरेतुन आलेले जोखड दूर सारावयाचे होते. त्याकरिताच राजकीय स्वातंत्र्याच्या कार्यात त्यांना थेट प्रवेश दिला. सत्याग्रहीमध्ये स्त्रियांचाही समावेश झाला. जगाच्या इतिहासात हे प्रथमतःच घडत होते. गांधीनी स्त्री केवळ उपभोग्य वस्तू आहे या दृष्टिकोनाला नाकारून तिच्या स्वतंत्र अस्तित्वाला मानले. एवढेच नव्हे तर तिला तिचा अभ्युदय घडवून आणण्याचे पोषक वातावरण पुरूष वर्गानी निर्माण करावे याचे उत्तरदायित्व टाकले.[8] सहजपणे, हृदय परिवर्तनातून स्त्री-पुरूष समतेला दिलेले उत्तेजन मानवी हक्काची बांधिलकी दाखविणारे आहे.

म. गांधीना आजच्याच नव्हे तर उद्याच्या पिढयाची सुध्दा काळजी होती. त्यामुळे मोठमोठया यंत्राच्या माध्यमातून होणारी पृथ्वीची लूट सांभाळावी, याकरिता महत्वाची मांडणी केली. दशरथलाल शहा यांनी 'गांधी का रचनात्मक कार्यक्रम' यामध्ये पर्यावरणाची सप्तपदी मांडलेली आहे. गांधीचे पर्यावरण विषयक विचार जे वेगवेगळया ठिकाणी विखुरल्या गेलेले होते त्याला एकत्रित करून मानवी हव्यासावरील नियंत्रणाचा विचार आणि आपली कर्तव्य याबाबत आग्रहपूर्वक मांडणी केलेली आहे. मूठभर वर्गाच्या हातात संसाधने जाणे ही सुध्दा गांधीना गुलामी वाटते.[9] त्या दृष्टिने त्यांचा पर्यावरण विषयक विचार मानवी हक्कांना बळकट करणारा आहे.

**समालोचन**

म. गांधीच्या मानवी हक्काचा परिघ वैश्विक आहे. ते केवळ भारतीय समुदाय म्हणून विचार करीत नाही तर जगाचा क्षेम व्हावा व तो चिरंतन असावा असाच त्यांचा प्रयत्न आहे. त्यामुळेच जगभरातील ११० नोबेल पारितोषिक प्राप्त व्यक्तीनी एकत्रित येऊन जगाला गांधी विचारांची



Scanned with CamScanner

उपयुक्तता असल्याचे स्पष्ट केले.[४] बराक ओबामा, नेल्सन मंडेला, दलाई लामा, सू की ही तर अलिकडची उदाहरण होत. 'मी आज जी अस्तित्वात आहे ते केवळ गांधीमुळे. गांधीच्या विचारामुळेच नजरकैदेत असताना स्वताला जीवंत राखु शकले. अहिंसेच्या मार्गाने यश मिळू शकते हे यापूर्वी कुणीही सिध्द केले नव्हते ते म. गांधीनी करून दाखविले.'[५] हिंसेत मानवी हक्काचा लोप होतो. द्वेष, क्रौर्य, अमानुषता जन्माला येते. वैरभाव नेहमी करीताच कायम राहतो. तर अहिंसा हे प्रेम, त्याग, मैत्री, सहिष्णूता, भातृत्व यांचे प्रतिक आहे. त्यामुळे मानवीयतेचा विचार गांधी विचारातच असल्याचे दिसते. गांधी त्यामुळेच मानवतावादाचे मेरूमणी ठरतात. अल्बर्ट आईनस्टाईनच्या कार्यालयात एकमात्र फोटो टांगलेला होता तो म्हणजे म. गांधीचा. गांधीनी साम्राज्यवाद, वसाहतवाद, अघोरी राष्ट्रवाद, वंशवाद, वेडाचार यातून आलेला धर्मवाद याला नेहमीच विरोध केला आणि हृदय परिवर्तनाच्या माध्यमातून मानवी समस्येला सोडविले, त्यामुळेच ते आजही प्रस्तुत ठरतात.

गांधीनी उभ्या आयुष्यात काही निकष पाळलीत, तसेच इतरांकडून अपेक्षाही केल्यात. आपल्या दैनंदिनीत 'अपना अथवा पराया' असा विचार त्यागला तरच समत्व निर्माण होईल. अपनामध्ये लोभ तर पराया म्हणजे द्वेष आहे. या दोन्ही गोष्टी मानवतावादी विरोधी आहे. उपदेशाच्या भूमिकेत न येता मात्र कृती करावी. गांधीच व्यक्तीत्व आरस्पानी राहिल. विशेषत: द. आफ्रिकेच्या तुलनेत येथील जनतेत स्वराज्याची भावना दृढ करणे सोपे नव्हते. येथील लोक वा राजे छोटया-छोटया राष्ट्रकात विभागले गेले होते. राष्ट्रक म्हणजेच टोळया. त्यांच्यात प्रथमत: गांधीनी राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण केली. त्यांना राष्ट्र होण्यास बाध्य केल. राष्ट्र या संकल्पनेला पात्र झाल्यानंतरच त्यांनी स्वराज्यात परिवर्तन घडवून आणलं. यापूर्वी अशी किमया साध्य करणे कुणालाच शक्य झाले नव्हते. गांधीचा हा प्रयोग अहिंसक आहे. ज्या देशात प्रचंड विविधता, विषमता, विभिन्न आचार-विचार आहे. त्यांच्यात एक सूत्र निर्माण करून आपल्या प्रतिष्ठेचे वाहक बनविणे शक्यच नव्हते. नव्या पिढीने हे सर्व समजून घेतलं पाहिजे. तेव्हाच आपण जगत असलेल्या स्वातंत्र्याचा अर्थ कळेल. गांधीनी हे सर्व कार्य एकहाती केले. त्यासाठी त्यांनी आपल्या जीवाची किंमतही मोजली. गांधीच्या शब्दातील शक्ती नौखाली काम करतांना सर्वानीच अनुभवली होती. त्यामुळे लॉर्ड माऊंटबॅटन यांनी त्यांच वर्णन "The One Man Army" असं केलं होत. यावरून गांधीच्या कार्याचा आवाका लक्षात येतो. व त्यांचे मानवतावादासंबंधीचे कार्य जाणवू लागते. गांधी कार्याची व विचारांची थोरवी यामध्येच असून ते प्रासंगिकही आहे. अन् भविष्याचा उज्वल मार्गही त्यामध्येच दडलेला आहे.

### संदर्भ ग्रंथ सूची

१. गांधी नव्याने समजून घेऊ या, संपा. अखिलेश आयलाने, मराठा साहित्य मंडळ, पुणे, २०१८, पृ.क्र. १३
२. महात्मा गांधीची विचारसृष्टी काही अलक्षीत पैलू, यशवंत सुमंत, साधना प्रकाशन, पुणे,२०१६ पृ.क्र. ५६
३. रचनात्मक कार्यक्रम वर्तमान संदर्भ मे, दशरथ लाल शाह, सर्व सेवा संघ प्रकाशन, राजघाट वाराणसी, २००२ पृ.क्र.१४
४. गांधी विचार, ठाकुरदास बंग, सर्व सेवा संघ प्रकाशन, राजघाट वाराणसी, २००३ पृ.क्र.६
५. वर्तमान वैश्विक परिदृष्य मे गांधी एवम जे. के. मेहता के विचारोंकी उपायदेयता, डॉ. आर. एन. सिंह, डॉ. चंन्द्रिका नाथपाणी, अध्ययन पब्लिशर्स, नई दिल्ली,२०१३, पृ.क्र. ११

❖❖❖



Scanned with CamScanner